Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

ऊसतोड मजुराला मारहाण; ॲट्रॉसिटीसह अंतर्गत गुन्हा दाखल!

(पान २ वर)



। सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १६२ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

नाशिक कुंभमेळ्याच्या बैठकीत महागोंधळ!

नाशिक : 31 ऑक्टोबर रोजी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्याच्या पूर्वतयारीची आढावा बैठक शनिवारी कुंभ प्राधिकरणाच्या कार्यालयात पार पडली. मात्र ही बैठक वादामुळे गाजली आहे. कुंभमेळामंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत 'त्र्यंबकराजा'च्या प्रतिकृतीवरून प्रशासकीय अधिकारी आणि आखाड्याच्या महंतांमध्ये खडाजंगी पाहायला मिळाली.पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त त्र्यंबकेश्वर येथील धरण आणि घाटावर 'त्र्यंबकराजा'ची भव्य प्रतिकृती साकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शनिवारी साधू महंत लोकप्रतिनिधी मंत्री गिरीश महाजन आणि शासकीय अधिकारी यांच्यासोबत पार पडलेल्या आढावा बैठकीत या प्रतिकृतीचे एक लहान प्रारूप सादर करण्यात आले.

"मिंधे गटाचे खासदार बंडू जाधव यांनी दुष्काळातील काजू-बदाम खुराकाचे उघड समर्थन केले

मुख्यमंत्री फक्त बोलतात, करत काहीच नाही'

आतापर्यंत कर्जमाफीच्या तीन याद्या प्रसिद्ध अंमलबजावणी झालेली नाही

जन सम्राट टाईम्स

मुंबई। "महाराष्ट्राचे सरकार बादशाही थाटात जगत आहे, पण अर्ध्यापेक्षा अधिक जनता दुष्काळाच्या सावटाखाली असून महाराष्ट्रात भय, भूक, तहान यांचे सैतानी राज्य येऊ घातले आले. पावसाच्या परतीचा प्रवास सुरू झाला आहे व दुष्काळाची गिधाडे मागे ठेवून मान्सून परत फिरत आहे. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भातील शेतकरी हवालदिल झाला आहे. या दुष्काळाबाबत फडणवीस-मिंध्यांचे सरकार गंभीर आहे काय?

राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे हे कोरड्या दुष्काळाची पाहणी करण्यासाठी मराठवाडा दौऱ्यावर गेले. नांदेडमध्ये दुष्काळी दौरा करण्याआधी विश्रामगृहावरील प्रशासकीय बैठकीत मंत्री, आमदार, खासदार मंडळी काजू-बदाम, सुका मेवा यांवर ताव मारीत असल्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. शेतकरी कोरड्या दुष्काळामुळे ठणाणा करीत आहे व सरकार सुका मेवा खाऊन ढेकर देत आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार आहे," अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेनं केली आहे."मिंधे गटाचे खासदार बंडू जाधव



यांनी दुष्काळातील काजू-बदाम खुराकाचे उघड समर्थन केले. हे खासदार म्हणतात,"काजू बदामाचा एवढा बाऊ का करता भाऊ? मला कडाडून भूक लागली म्हणून काजू-बदाम खाल्ले. हजार-पाचशे रुपयांच्या काजू-बदामांवरून इतका गोंधळ का घालायचा?" खासदारांचे हे बोलणे अमानुष आहे. 50-50 कोटी रुपये खाऊन ढेकर देणाऱ्यांची भूक भागलेली नाही. पुन्हा दुष्काळाच्या बैठकीत भूक लागली म्हणून काजू-बदाम खायचे ही कसली रीत? मुख्यमंत्री यावर म्हणतात, "असे काजू-बदाम खाणे बरे नाही. प्रशासनाने संवेदनशील राहावे. प्रत्येक गोष्टीचे राजकारण करण्याची विरोधकांना सवय आहे." मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अशा असंवेदनशीलतेची अपेक्षा नव्हती. काजू-बदामाचे खापर त्यांनी प्रशासनावर फोडले. अधिकाऱ्यांनी लाख काजू-बदाम, बिर्याणीचे ताट समोर आणून ठेवले असेल, पण खाणाऱ्यांना लाजा वाटल्या पाहिजेत, पण निर्लज्जतेच्या खांबांवर जे सरकार उभे आहे त्यांच्याकडून वेगळी काय अपेक्षा करणार?" असा खोचक सवाल 'सामना'च्या अग्रलेखातून करण्यात आलाय."राज्यात उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीनसारखी पिके जळून गेली आहेत. शेतकरी बांधावर बसून रडतो आहे. गुरांचा चारा, पिण्याचे पाणी, पोरांचे शिक्षण, मुलींची लग्ने, विझत चाललेल्या चुलींचे भेसूर चित्र महाराष्ट्र पाहत आहे. मुख्यमंत्री मात्र म्हणत आहेत की, "मंत्रिमंडळ बैठकीत या गंभीर परिस्थितीवर सखोल चर्चा झाली आहे. सर्व जिल्ह्यांतील प्राथमिक आढावा पूर्ण होईल. त्यानंतर लगेच पिकांचे अधिकृत पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत पुरविली जाईल." मुख्यमंत्र्यांच्या बोलण्यावर विश्वास कसा ठेवायचा?

अधिवेशन बोलावून चर्चा घडवायला हवी

आतापर्यंत कर्जमाफीच्या तीन याद्या प्रसिद्ध झाल्या असे म्हणतात, पण "कर्जमाफी मिळालेला शेतकरी दाखवा व पाच हजार रुपये बक्षीस मिळवा" अशी घोषणा करण्यासारखी स्थिती गावागावांत दिसते. राज्य सरकारला शेतकऱ्यांवरील संकटांची चिंता नाही. ते राजकारणात व चढाओढीत अडकून पडले आहे. सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग व उडीद ही पिके शेतकऱ्यांच्या हातून गेली आहेत. दुष्काळाच्या प्रश्नी सरकारने विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून चर्चा घडवायला हवी.

मुंबईत ठाकरेंसह काँग्रेसला मोठा धक्का! शेकडो कार्यकर्त्यांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: गेल्या काही दिवसापासून सातत्यानं विरोधी पक्षातून सत्ताधारी पक्षात प्रवेश होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आजही मुंबईत शिवसेना ठाकरे गटाला आणि काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. शिवसेना सचिव तथा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या हस्ते पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. माथाडी आणि जनरल कामगार युनियनचे मुंबई समन्वयक निखिल प्रकाश गुळेकर यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, शाने आलम खान, भरत चोपडे, विधानसभा समन्वयक अभिषेक चव्हाण आणि उपशाखा प्रमुख आनंद कातुर्डे यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांचाही शिवसेनेत पक्षप्रवेश केला. या पक्ष प्रवेशासनं उत्तर मुंबईत शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढणार आहे. मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि कामगार बांधवांच्या पक्षप्रवेशामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला बळ मिळाल्याचा दावा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केलाय. नव्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार बांधवांचे शिवसेनेच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आलं आहे. मुंबई उपनगर मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रवेश केला. खरोखरच जे बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन चालले आहेत त्यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. या युवा पिढीला कोणी न्याय द्यायचं काम करत असेल तर एकनाथ शिंदे साहेब करत आहे असे कदम म्हणाले. दिशा सालियान प्रकरणी बोलताना कदम म्हणाले की, जी सीबीआयच्या



मार्फत चौकशी होणार आहे ती पुढे येणारच आहे जे देशाला आणि जगाला कळणारच आहे. दिशा सालियन यांच्याबाबत जे घडलं त्याला न्याय मिळाला पाहिजे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या छात्रो की गुंज या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर मिमिक्री करण्यात आली. यावर बोलताना कदम म्हणाले की, याच्यापेक्षा दुर्दैव आपल्या देशामध्ये काय असू शकत नाही. ज्यांची इंडिया लाईन्स आहे तिथे त्याला नेता म्हणतात. अशा व्यक्ती जो पंतप्रधान मोदीजींच्या आई बद्दल ज्या हयात नाहीत त्यांच्यावर असा भाष्य करत असेल तर असा नेता आपल्या देशाचा पंतप्रधान होऊ शकत नाही असे कदम म्हणाले. गेल्या काही दिवसापासून सातत्यानं विरोधी पक्षातून सत्ताधारी पक्षात प्रवेश होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आजही मुंबईत शिवसेना ठाकरे गटाला आणि काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. शिवसेना सचिव तथा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या हस्ते पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. माथाडी आणि जनरल कामगार युनियनचे मुंबई समन्वयक निखिल प्रकाश गुळेकर यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार,भरत चोपडे,अभिषेक चव्हाण आणि उपशाखा प्रमुख आनंद कातुर्डे यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांचाही शिवसेनेत पक्षप्रवेश केला. या पक्ष प्रवेशासनं उत्तर मुंबईत शिवसेना शिंदे गटाची ताकद वाढणार आहे. मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि कामगार बांधवांच्या पक्षप्रवेशामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला बळ मिळाल्याचा दावा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केलाय. नव्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार बांधवांचे शिवसेनेच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आलं आहे. मुंबई उपनगर मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रवेश केला. खरोखरच जे बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन चालले आहेत त्यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. या युवा पिढीला कोणी न्याय द्यायचं काम करत असेल तर एकनाथ शिंदे साहेब करत आहे असे कदम म्हणाले.

टाटा ग्रुपमधील वाद कोर्टात जाणार?

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: टाटा ट्रस्ट्सनं टाटा सन्सच्या बोर्डानं केलेली एन. चंद्रशेखरन यांची चेअरमनपदावरील फेर नियुक्ती फेटाळली आहे. टाटा सन्सच्या बोर्डाच्या बैठकीत झालेल्या 4-1 मतदानाला काही कायदेशीर अर्थ नाही कारण कंपनीच्या नियमानुसार चेअरमन नियुक्तीसाठी टाटा ट्रस्टनं नामनिर्देशित केलेल्या संचालकाची सहमती अनिवार्य आहे, जी पूर्ण झालेली नाही,अशी बाजू मांडण्यात आली आहे. टाटा सन्सच्या बोर्डानं एन. चंद्रशेखरन यांची पुढील 5 वर्षांच्या कार्यकाळासाठी चेअरमन पदावर निवड करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र, टाटा सन्समधील सर्वाधिक भागधारक असलेल्या टाटा ट्रस्टनं हा निर्णय बेकायदेशीर असल्याचं म्हटलं.

टाटा ट्रस्टनं रविवारी एक प्रसिद्धीपत्रक जारी केलं असून कंपनीच्या नियमानुसार टाटा ट्रस्टच्या नामनिर्देशित संचलाकांचा पाठिंबा कोणताही निर्णय घेण्यासाठी बोर्डाला दिलेला नाही असं म्हटलं आहे. टाटा ट्रस्टसनं बोर्डाकडून देण्यात आलेला कास्टिंग वोस्टचा तर्क फेटाळून लावला आहे. जेव्हा नियम स्पष्ट आहे तेव्हा त्याला अडथळा म्हटलं जाऊ शकत नाही. टाटा ट्रस्टसच्या मते अध्यक्षांचं निर्णायक मत जेव्हा लागू होतं जेव्हा बोर्डात मतांची बरोबरी झालेली असते. हा नियम टाटा ट्रस्टसनं निवडलेल्या संचालकांवर लागू नसतो. मतदानाचा निकाल 4-1 असो की इतर अआकडे असो, हा निर्णय मान्य होत नाही, असं टाटा ट्रस्टसकडून सांगण्यात आलं. टाटा ट्रस्टसनं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं की टाटा सन्सच्या बोर्डात टाटा ट्रस्टसचे दोन संचालक आहेत. दोनचं बहुमत दोन होतं, एक नाही. एका संचालकानं प्रस्तावाविरोधात मतदान केलं.

यामुळं असोसिएशनच्या नियमानुसार टाटा ट्रस्टसच्या संचालकाचं सकारात्मक समर्थन चंद्रशेखरन यांच्या नियुक्तीला मिळालेलं नाही.

एका खेळाडूसाठी BCCI आणि अजित आगरकर भिडले?

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली । प्रतिनिधी: टीम इंडियाने अफगाणिस्तानविरुद्धची तीन सामन्यांची टी-20 मालिका 3-0 अशी जिंकली. मात्र, मैदानाबाहेर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या गोटात गेल्या काही काळापासून मतभेदांची चर्चा रंगली आहे. आता मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील कथित मतभेदांबाबत एक महत्त्वाचा खुलासा समोर आला आहे. एका वृत्तानुसार, आगरकर आणि बीसीसीआयमधील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये मतभेद आजचे नाहीत. गेल्या काही वर्षांपासून विविध निर्णयांवरून दोन्ही बाजूंमध्ये मतभिन्नता असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर आगरकर यांच्या राजीनाम्याच्या चर्चांनीही जोर धरला आहे.अहवालानुसार, 2023 मध्ये आयर्लंडविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी जसप्रीत बुमराहला भारतीय संघाचं कर्णधारपद देण्याच्या निर्णयावरून आगरकर आणि बीसीसीआयमध्ये मतभेद झाले होते. ऑगस्ट 2023 मध्ये भारताला आयर्लंडविरुद्ध टी-20 मालिका खेळायची होती. त्यावेळी जसप्रीत बुमराह दीर्घकाळाच्या दुखापतीनंतर क्रिकेटमध्ये पुनरागमन करत होता. त्यामुळे त्याच्यावर कर्णधारपदाची अतिरिक्त जबाबदारी देण्याऐवजी त्याचा कामाचा ताण नियंत्रित ठेवावा, अशी आगरकरांची भूमिका असल्याचे



या वृत्तात म्हटले आहे. आगरकर यांच्या मते, या मालिकेसाठी ऋतुराज गायकवाडकडे कर्णधारपद सोपवणे योग्य ठरले असते. गायकवाडकडे भविष्यातील नेतृत्वासाठी पाहिले जात होते आणि त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर कर्णधार म्हणून अनुभव देण्याची ही चांगली संधी असल्याचे आगरकरांना वाटत होते. जसप्रीत बुमराहलाच कर्णधार करण्याचा आग्रह धरला गेला. बुमराह स्वतः कर्णधारपद स्वीकारण्यास इच्छुक असल्याने अखेरीस बोर्डाचा निर्णय मान्य करण्यात आला. विशेष म्हणजे, त्यावेळी ऋतुराज गायकवाडची 2023 आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाली होती. त्यामुळे आयर्लंड दौऱ्यात नेतृत्वाची संधी मिळाल्यास त्याला भविष्यातील नेता म्हणून तयार करण्यासाठी मदत होऊ शकते, असा आगरकरांचा विचार असल्याचे सांगितले जाते. अखेर बुमराहच्या नेतृत्वाखाली भारताने आयर्लंडविरुद्धची मालिका 2-0 अशी जिंकली.निवडप्रक्रियेवरूनही आगरकर आणि बोर्डामध्ये मतभेद असल्याचा दावा करण्यात आला आहे. रोहित शर्माला टी-20 संघातून वगळण्यासंदर्भात आगरकरांची भूमिका आणि बोर्डाची भूमिका एकसारखी नसल्याचे बोर्डाकडून रोहितला सार्वजनिक पाठिंबा मिळाल्याने आगरकर नाराज झाल्याचा दावाही करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

परतीचा पाऊस राज्याला झोडपणार; ताशी 30-40 च्या स्पीडने वारे वाहणार

दोन दिवसवादळी पावसाची शक्यता ; पुण्यासह या 8 जिल्ह्यात वादळी पावसाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: शनिवारपासून देशातून परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे. एकीकडे पाऊस माघारी जात असतानाही राज्याला झोडपण्याची शक्यता आहे. आज 21 सप्टेंबर रोजी राज्यात सर्वदूर वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचा घाटमाथा आणि सांगली जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून हवामान विभागाने यलो अलर्ट वर्तवला आहे. तर, उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परतीचा पाऊस राज्याला झोडपण्याची शक्यता आहे. पश्चिम राजस्थानातील माघारीची सीमा कायम आहे. दोन दिवसांत आणखी काही ठिकाणी परतीच्या मान्सूनसाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. ईशान्य अरबी समुद्रात समुद्र सपाटीपासून 3.1 ते 7.6 किमी उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तर अंदमान समुद्र आणि पूर्व मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. वायव्येकडे सरकत असलेली ही प्रणाली तीव्र होण्याचे संकेत आहेत.

बुधवारपर्यंत ही प्रणाली ओडिशा-आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याकडे येण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार आज पुण्यासह अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, नाशिक आणि पालघर जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका



ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहेआज मध्य महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचा घाटमाथा, सांगली जिल्ह्यात जोरदार पावसाची तसेच कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर, नांदेड आणि विदर्भातील अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शनिवारपासून देशातून परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे. एकीकडे पाऊस माघारी जात असतानाही राज्याला झोडपण्याची शक्यता आहे. आज 21 सप्टेंबर रोजी राज्यात सर्वदूर वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचा घाटमाथा आणि सांगली जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून हवामान विभागाने यलो अलर्ट वर्तवला आहे. तर, उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परतीचा पाऊस राज्याला झोडपण्याची शक्यता आहे. मान्सूनसाठी पोषक वातावरण निर्माण होणार आहे. ईशान्य अरबी समुद्रात समुद्र सपाटीपासून 3.1 ते 7.6 किमी उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तर अंदमान समुद्र आणि पूर्व मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. वायव्येकडे सरकत असलेली ही प्रणाली तीव्र होण्याचे संकेत आहेत. बुधवारपर्यंत ही प्रणाली ओडिशा-आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याकडे येण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहेआज मध्य महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचा घाटमाथा, सांगली जिल्ह्यात जोरदार पावसाची तसेच कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्यपुणे,धाराशिव, लातूर, नांदेड आणि विदर्भातील अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाची शक्यता आहे.

मी समाजासाठी लढतोय; खासदार संजय जाधव

जन सम्राट टाईम्स

जळगाव| प्रतिनिधी: परभणीचे खासदार संजय जाधव यांनी छत्रपती संभाजीगनरमध्ये मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अंतरवाली सराटी हे गाव परभणी लोकसभा मतदारसंघात येत असल्यानं जरागेंचं आणि माझं नातं जिव्हाळ्याचं असल्याचं म्हटलं. दिशा सालियन मृत्यू प्रकरणावरुन सुरु असलेल्या घडामोडींबाबत प्रश्न विचारला असता संजय जाधव यांनी ते प्रकरण माहिती नसल्याचं म्हटलं. छत्रपती संभाजीनगरमध्ये ज्या विषयासाठी आलोय त्या विषयावर विचारा असं उत्तर खासदार जाधव यांनी दिलं. खासदार संजय जाधव म्हणाले अंतरवाली सराटी हे गाव माझ्या लोकसभा मतदारसंघातील आहे. मनोज जरांगे पाटील आणि माझं नातं हे जिव्हाळ्याचं आहे.त्यामुळे माझ्या घरातील व्यक्ती जर आजारी असेल तर जाऊन भेटणं आणि त्यांची विचारपूस करणे माझं कर्तव्य आहे, असं त्यांनी म्हटलं. संजय जाधव यांनी काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत परभणीत मेळावा घेतला होता, त्यावरुन मनोज जरांगे यांनी टीका केली होती. यासंदर्भात बोलताना संजय जाधव म्हणाले की घरातल्या एखाद्या कर्त्या व्यक्तीला त्यांच्या माणसाला बोलायचा अधिकार असतो, त्यामुळे ते बोलले तर निश्चितच वाईट वाटण्याचं कारण काही नाही. त्यावेळी मनोज जरांगे यांची भावना वेगळी होती की मी समाजासाठी लढतोय आणि तुम्ही अशा स्वरूपाचे कार्यक्रम घेत आहात. त्यामुळे ते साहजिक होतं असं संजय जाधव यांनी म्हटलं. भाषण संपल्यानंतर मी शेवटी बोललो होतो, पाटलांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, याची आठवण देखील त्यांनी करुन दिली. मनोज जरांगे पाटील उपोषण सोडल्यानंतर त्यांच्यावर टीका होत असल्यासंदर्भात विचारल्यास संजय जाधव यांनी ते बाकीचं नको मला माझा विषय काय आहे ते माहिती आहे, असं संजय जाधव म्हणाले.

यंदाचा ऊस गळीत हंगाम वादळी ठरणार!

15 ऑक्टोबरला कारखाने सुरु करण्यास राजू शेट्टींचा विरोध, नेमक्या काय आहेत मागण्या

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी : यावर्षी ऊसाचा गाळप हंगाम 15 ऑक्टोबरपासून सुरु करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. या निर्णयाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात विरोधत होत आहे. असातच स्वाभिमानी शेतकरी संगटनेनं देखील विरोध केला आहे. 15 ऑक्टोबरपासून कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न केला, तर शेतकरी आणि कारखानदार यांच्यातील संघर्ष अटळ असेल, असा थेट इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. राजू शेट्टी थेट साखर कारखानदारांची भेट घेत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या उद्योगाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख माजी खासदार राजू शेट्टी यांनी थेट कारखानदारांच्या दारात जात आक्रमक मोहीम सुरू केली आहे. राजू शेट्टी सध्या कोल्हापूर, सांगली आणि महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील प्रमुख साखर कारखानदारांच्या गाठीभेटी घेत असून, आंदोलनाला सहकार्य करण्याचे आवाहन करत आहेत. सरकारच्या दबावाला बळी पडून मागण्या मान्य होण्यापूर्वीच जर 15 ऑक्टोबरपासून कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न केला, तर शेतकरी आणि कारखानदार यांच्यातील संघर्ष अटळ असेल, असा थेट इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.कारखानदारांना दिलेल्या निवेदनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने प्रामुख्याने खालील मागण्यांवर केंद्र व राज्य सरकारकडे एकजुटीने पाठपुरावा करण्याचा आग्रह धरला आहे. साखरेचा किमान हमीभाव (MSP) प्रतिकिलो 50 रुपये निश्चित करावा.'सी-हेव्ही' इथेनॉलचा दर प्रतिलिटर 70 रुपये करावा आणि इथेनॉल निर्मितीवरील जाचक निर्बंध उठवावेत. केंद्र सरकारने नाबार्ड , एसडीएफ फंड किंवा एनसीडीसी अंतर्गत खासगी व सहकारी साखर कारखान्यांना वार्षिक 4 टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनावर बंदी घातल्याने प्रकल्पांच्या कर्जाच्या व्याजाचा व हप्त्याचा भार कारखान्यावर येणार असल्याने संपुर्ण वर्षभराची व्याज सवलत व हप्त्यास मुदतवाढ योजना जाहीर करावी यासह विविध मागण्या केल्या आहेत. संघर्ष केवळ शेतकऱ्यांचा नसून संपूर्ण साखर कारखानदारी वाचवण्याचा आहे. जर साखरेचे आणि इथेनॉलचे दर वाढले, तरच कारखाने टिकतील आणि शेतकरीही जगतील.



त्यामुळे कारखानदारांनी सरकारच्या दबावाला बळी न पडता, मागण्या मान्य होईपर्यंत कारखाने सुरू करू नयेत.सीमाभागातील (कर्नाटक) कारखाने आधी सुरू झाल्यास महाराष्ट्रातील ऊस तिकडे पळवला जाण्याची शक्यता असते, त्यामुळे राजू शेट्टी यांनी कर्नाटक सीमाभागातील कारखानदारांशीही चर्चा करून त्यांना या आंदोलनात एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

कारखानदार एकत्र आले तर ऊस उत्पादक शेतकरी पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.साखर आयुक्त आणि सरकारने गळीत हंगाम सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. मात्र, राजू शेट्टी यांच्या या झंझावाती दौऱ्यामुळे आणि कारखानदारांना दिलेल्या इशाऱ्यामुळे यंदाचा ऊस हंगाम वादळी ठरणार हे स्पष्ट झाले आहे.आज दिवसभरात राजू शेट्टी यांनी मंत्री हसन मुश्रीफ , सतेज पाटील , संजय मंडलिक , समरजित घाटगे , स्वरूप महाडिक , सिस्मा चे अध्यक्ष योगेश पाटील या सर्व साखर कारखानदारांची भेट घेतली. क्टोबरपासून सुरु करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. या निर्णयाला शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात विरोधत होत आहे. असातच स्वाभिमानी शेतकरी संगटनेनं देखील विरोध केला आहे. 15 ऑक्टोबरपासून कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न केला, तर शेतकरी आणि कारखानदार यांच्यातील संघर्ष अटळ असेल, असा थेट इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. राजू शेट्टी थेट साखर कारखानदारांची भेट घेत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील साखर उद्योग मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या उद्योगाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख माजी खासदार राजू शेट्टी यांनी थेट कारखानदारांच्या दारात जात आक्रमक मोहीम सुरू केली आहे. राजू शेट्टी सध्या कोल्हापूर, सांगली आणि महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील प्रमुख साखर कारखानदारांच्या गाठीभेटी घेत असून, आंदोलनाला सहकार्य करण्याचे आवाहन करत आहेत. सरकारच्या दबावाला बळी पडून मागण्या मान्य होण्यापूर्वीच जर 15 ऑक्टोबरपासून कारखाने सुरू करण्याचा प्रयत्न केला, तर शेतकरी आणि कारखानदार यांच्यातील संघर्ष अटळ असेल, असा थेट इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.कारखानदारांना दिलेल्या निवेदनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने प्रामुख्याने खालील मागण्यांवर केंद्र व राज्य सरकारकडे एकजुटीने पाठपुरावा करण्याचा आग्रह धरला आहे. साखरेचा किमान हमीभाव (MSP) प्रतिकिलो 50 रुपये निश्चित करावा.'सी-हेव्ही' इथेनॉलचा दर प्रतिलिटर 70 रुपये करावा आणि इथेनॉल निर्मितीवरील जाचक निर्बंध उठवावेत. केंद्र सरकारने नाबार्ड , एसडीएफ फंड किंवा एनसीडीसी अंतर्गत खासगी व सहकारी साखर कारखान्यांना वार्षिक 4 टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादनावर बंदी घातल्याने प्रकल्पांच्या कर्जाच्या व्याजाचा व हप्त्याचा भार कारखान्यावर येणार असल्याने संपुर्ण वर्षभराची व्याज सवलत व हप्त्यास मुदतवाढ योजना जाहीर करावी यासह विविध मागण्या केल्या आहेत. संघर्ष केवळ शेतकऱ्यांचा नसून संपूर्ण साखर कारखानदारी वाचवण्याचा आहे. जर साखरेचे आणि इथेनॉलचे दर वाढले, तरच कारखाने टिकतील आणि शेतकरीही जगतील. त्यामुळे कारखानदारांनी सरकारच्या दबावाला बळी न पडता, मागण्या मान्य होईपर्यंत कारखाने सुरू करू नयेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

शिवाजी महाराज गणेश मित्र मंडळाच्या महाभंडाऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद!



जन सम्राट टाईम्स

पारोळा| प्रतिनिधी पारोळा शहरातील आजाद चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाभंडारा सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री गणरायाची महाआरती करण्यात आली. त्यानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या प्रसंगी आमदार अमोलदादा पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील, शिवसेना शहरप्रमुख गटनते, नगरसेवक अमृतभाऊ चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनीषभाऊ पाटील, उपनगराध्यक्ष सुदामभाऊ चौधरी, कैलासभाऊ चौधरी, शिवसेना उपगटनेते तथा नगरसेवक पंकजभाऊ मराठे, नगरसेवक भूषण टिपरे, शहरप्रमुख अण्णा चौधरी, भागवतअण्णा चौधरी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. आठ वर्षांची सेवाभावी परंपरा श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मित्र मंडळ गेल्या आठ वर्षांपासून उत्साहाने आणि परिश्रमपूर्वक गणेशोत्सव साजरा करत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध नाविन्यपूर्ण तसेच समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा मंडळाने निर्माण केली आहे. गणेशोत्सव काळात भजन, कीर्तन, खानदेशी गीतांचे कार्यक्रम, समाजप्रबोधनपर व्याख्याने यांसह विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ११ हजारांहून अधिक भाविकांनी घेतला महाप्रसाद मंडळाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारा भव्य महाभंडारा हा गणेशोत्सवातील विशेष आकर्षण ठरतो. यंदाच्या महाभंडाऱ्यात ११ हजारांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. नियोजनबद्ध आयोजन आणि सेवाभावी कार्याची ही पावती असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. २०० सेवेकऱ्यांकडून निस्वार्थ सेवा मंडळाच्या विविध सेवाकार्यात २०० हून अधिक सेवेकरी गणेशोत्सव काळात निस्वार्थ भावनेने योगदान देतात. महाप्रसाद वितरणासह विविध उपक्रमांचे नियोजन व व्यवस्थापन सेवेकऱ्यांकडून केले जाते. मोठ्या संख्येने युवकांना एकत्र आणून त्यांच्यात सेवा, सामाजिक बांधिलकी आणि संघटनभावना निर्माण करण्याचे कार्य मंडळ सातत्याने करत आहे. त्यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा आणि सेवाभावाचा उत्सव ठरत असल्याचे मंडळाच्या कार्यातून दिसून येते.

पारोळ्यात ऊसतोड मजुराला मारहाण; ॲट्रॉसिटीसह अंतर्गत गुन्हा दाखल!

जन सम्राट टाईम्स



पारोळा | प्रतिनिधी: ऊसतोडीसाठी घेतलेल्या उचल (ॲडव्हान्स) रकमेच्या परतफेडीवरून झालेल्या वादातून भिल्ल समाजातील एका मजुराला जातीवाचक शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना पारोळा तालुक्यातील राजवड येथे घडल्याचे समोर आले आहे. या मारहाणीत मजुराच्या डाव्या हाताच्या मनगटाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या (BNS) विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गजानन रमेश सोनवणे (वय ३५, रा. बिलखेडा, ता. धरणगाव) यांनी ऊसतोडीच्या कामासाठी मुकादम जितेंद्र गोकुळ पाटील (रा. बोदर्डे, ता. पारोळा) यांच्याकडून ३० हजार रुपयांची उचल घेतली होती. मात्र कौटुंबिक कारणांमुळे दौंड येथे ऊसतोडीस जाणे शक्य नसल्याने ही रक्कम परत करण्याचे ठरले होते. शेतात मारहाण केल्याचा आरोप तक्रारीनुसार, १८ सप्टेंबर २०२६ रोजी राजवड, ता. पारोळा येथील शेतात गजानन सोनवणे काम करत असताना संशयित जितेंद्र पाटील तेथे आला. त्याने उचल रकमेची मागणी करत धमकी दिली आणि फिर्यादीला धक्का देऊन खाली पाडले. त्यानंतर लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप आहे. बचाव करताना गजानन सोनवणे यांच्या डाव्या हाताच्या मनगटाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले. तसेच संशयिताने अश्लील व जातीवाचक शिवीगाळ करत धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनास्थळी उपस्थित कैलास पाटील व विकास सोनवणे यांनी मध्यस्थी करून मजुराची सुटका केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. रुग्णालयात उपचारानंतर पोलिसांत फिर्याद जखमी गजानन सोनवणे यांच्यावर प्रथम धरणगाव ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना जळगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर २० सप्टेंबर २०२६ रोजी त्यांनी पारोळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून पारोळा पोलिसांनी संशयित जितेंद्र गोकुळ पाटील यांच्याविरुद्ध BNS कलम ११७(३), ११५(२), ११८(१), ३५२, ३५१(२), २९६ तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीअधिनियमातील कलम अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते करीत आहेत.ऊसतोडीसाठी घेतलेल्या रकमेच्या परतफेडीवरून झालेल्या वादातून भिल्ल समाजातील एका मजुराला जातीवाचक शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना पारोळा तालुक्यातील राजवड येथे घडल्याचे समोर आले आहे.

अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक भान; हनुमान मंदिरासाठी ५१ हजारांची मदत

फ्रेंड्स क्लब कासारखेडेचा आदर्श उपक्रम

जन सम्राट टाईम्स



कासारखेडे । प्रतिनिधी: सार्वजनिक उत्सव आणि विविध कार्यक्रमांमध्ये बँड-वाजंत्री, डीजे तसेच अनावश्यक भपक्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्याची प्रथा वाढत असताना कासारखेडे येथील 'फ्रेंड्स क्लब कासारखेडे' या मंडळाने अनावश्यक खर्चाला फाटा देत सामाजिक व धार्मिक कार्याला हातभार लावण्याचा आदर्श निर्माण केला आहे. मंडळाने बँड-वाजंत्रीचा खर्च टाळून वाचविलेली ₹५१ हजारांची रक्कम श्री हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सुपूर्द केली. बँड-वाजंत्रीचा खर्च रद्द; मंदिराच्या जीर्णोद्धाराला मदत उत्सवादरम्यान होणारा बँड-वाजंत्री व इतर अनावश्यक खर्च टाळून तोच निधी गावातील मंदिराच्या जीर्णोद्धारासारख्या कायमस्वरूपी उपयोगी कार्यासाठी देण्याचा संकल्प मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी केला. या निर्णयाला ग्रामस्थांनीही पाठिंबा दिला. त्यानुसार बँड-वाजंत्रीचा खर्च रद्द करून उपलब्ध झालेली ₹५१,००० रुपयांची रक्कम श्री हनुमान मंदिर जीर्णोद्धार समिती तसेच गावातील ज्येष्ठ नागरिकांकडे सुपूर्द करण्यात आली. 'मंदिर आपलं... जबाबदारी आपली...' 'मंदिर आपलं... जबाबदारी आपली...' या भावनेतून तरुणांनी घेतलेला हा निर्णय गावातील सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरत आहे. गाव एकत्र आले आणि योग्य कामासाठी संकल्प केला तर तो निश्चितच पूर्ण करता येतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. क्षणिक मनोरंजनासाठी होणाऱ्या अवाजवी खर्चापेक्षा गावातील धार्मिक व सार्वजनिक वास्तूंच्या विकासासाठी निधी देण्याचा तरुणांचा निर्णय इतर मित्रमंडळांसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले. मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित देणगी हस्तांतरणप्रसंगी फ्रेंड्स क्लब कासारखेडेचे अध्यक्ष देवेंद्र लोहार, उपाध्यक्ष निवृत्ती (उर्फ गजू पाटील), खजिनदार देविदास पाटील यांच्यासह कल्पेश पाटील, देविदास पाटील (DK), भूषण पाटील, पंकज पाटील, साई पवार, गौरव पाटील, सागर पाटील, विजय वडर तसेच श्री संत तुकाराम महाराज मित्र मंडळाचे प्रतिनिधी, गावातील ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. डीजे किंवा बँड-वाजंत्रीच्या क्षणिक मनोरंजनापेक्षा मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी दिलेले हे योगदान अधिक मोलाचे असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त करत फ्रेंड्स क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

---

22 वर्षीय विद्यार्थ्याच्या मृत्यू प्रकरणी 'तो' प्राध्यापक अडकणार?

जन सम्राट टाईम्स

धरणगाव | प्रतिनिधी: आयआयटी मुंबईच्या पवई कॅम्पसमध्ये 22 वर्षीय विद्यार्थ्याच्या आत्महत्या प्रकरणामध्ये लवकरच प्राध्यापकाची चौकशी होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आल्यानंतर, आरोपी करण्यात आलेल्या प्राध्यापकासह संबंधित व्यक्तींना चौकशीसाठी लवकरच पाचारण केले जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस आयुक्त (डिटेक्शन) यांच्या नेतृत्वाखाली केला जाणार आहे.22 वर्षीय साहिल रवींद्र वाकोडे या यवतमाळ जिल्ह्यातील तरुण आयआयटी अँड इंजिनिअरिंग विभागात बीटेकच्या दुसऱ्या वर्षात शिकत होता. शुक्रवारी सायंकाळी पवई कॅम्पसमधील होस्टेल क्रमांक चारमधील खोलीत छताच्या पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत तो आढळला. मीड टर्म परीक्षेदरम्यान मोबाइल फोन आणि 'चॅटजीपीटी'चा वापर केल्याचा आरोप त्याच्यावर होता. परीक्षेचा प्रश्नपत्रिकेचा मजकूर चॅटजीपीटीवर अपलोड करून उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे आयआयटी मुंबईने म्हटले आहे. मात्र, या प्रकरणी त्याच्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नव्हती, असे संस्थेने स्पष्ट केले आहे.परीक्षेतील प्रकारानंतर प्राध्यापक सूर्यनारायण दूल्ला आणि विभागप्रमुखांनी साहिलशी चर्चा करून त्याचे समुपदेशन केले होते. या घटनेचा त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीवर विपरित परिणाम होणार नाही, असे त्याला आश्वस्त करण्यात आल्याचे आयआयटीकडून सांगण्यात आले. त्यानंतर तो होस्टेलमधील आपल्या खोलीत परतला आणि त्याच दिवशी सायंकाळी त्याचा मृतदेह आढळला. साहिलच्या पालकांच्या तक्रारीवरून पवई पोलिसांनी शनिवारी भारतीय न्याय संहितेच्या कलम 108 तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.साहिलला संस्थात्मक पातळीवर छळाला सामोरे जावे लागले तसेच जातीय भेदभाव करण्यात आल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.

गणपती विसर्जन मिरवणुकीत ध्वनी प्रदूषणाबाबत पोलिसांचे प्रात्यक्षिक



जन सम्राट टाईम्स

नशिराबाद| प्रतिनिधी: आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने नशिराबाद पोलीस स्टेशनच्या वतीने गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान 'नॉईज लेव्हल मीटर'द्वारे डीजे व बँडच्या आवाजाची डेसिबल पातळी मोजण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. नशिराबाद येथील पेठ भागात श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. पोलिसांकडून प्रत्यक्ष डेमो मिरवणुकीत बँड तसेच डीजे सुरू असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांनी स्वतः 'नॉईज लेव्हल मीटर' उपकरणाचा वापर करून आवाजाची डेसिबल पातळी कशा पद्धतीने मोजली जाते, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. हे प्रात्यक्षिक कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यासाठी नसून उपकरणाची कार्यक्षमता तपासणे तसेच उत्सवादरम्यान ध्वनीची पातळी प्रत्यक्ष कशी नोंदवली जाते, याबाबत नागरिक व संबंधितांना माहिती देण्याच्या उद्देशाने घेण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. डीजे व बँड चालकांना नियमपालनाचे निर्देश प्रात्यक्षिकानंतर पोलीस प्रशासनाने गणेश मंडळे, डीजे चालक, ध्वनिक्षेपक मालक आणि बँड पथकांना ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. ध्वनी मर्यादेचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० तसेच पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा देण्यात आला. शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आवाजात डीजे किंवा बँड वाजविल्यास संबंधित साऊंड सिस्टीम, ॲम्प्लीफायर्स व वाहने जप्त करण्याची कारवाई केली जाऊ शकते, असेही पोलिसांकडून सांगण्यात आले.

आम्ही भारताचे लोक'ची कार्यकारिणी जाहीर ग्रामीण व शहर विभागाची संघटनात्मक बांधणी!

तालुका-शहरनिहाय पदाधिकाऱ्यांवर देण्यात आल्या जबाबदाऱ्या

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी : आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ (महाराष्ट्र राज्य)'च्या नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहर विभागाची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध तालुके, शहरे तसेच ग्रामीण भाग चळवळीच्या संघटनात्मक प्रवाहाशी जोडण्याच्या दृष्टीने ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. राज्य प्रसिद्धी व जनसंपर्क प्रमुख तथा नांदेड जिल्हा समन्वयक (प्रभारी) संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर तसेच मुख्य समन्वयक संदेश शालिनी संभाजी कर्डक यांच्या संपर्क, समन्वय आणि प्रयत्नांतून नांदेड जिल्ह्यातील संघटनात्मक रचना उभारण्यात आल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यातील विविध स्तरांवर जबाबदार पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून चळवळीचे कार्य व्यापक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तालुका व शहरनिहाय जबाबदारी नांदेड उत्तरसाठी संजय खंदारे, नांदेड दक्षिणसाठी करण इंगोले, मुखेडसाठी संघर्ष भद्रे, कंधारसाठी धम्मदीप गायकवाड, लोहासाठी किशोर भावे, मुदखेडसाठी अशोक खिल्लारे, धर्माबादसाठी कुलदीप मस्के, देगलूरसाठी मंगलदीप



सिताफुले, हदगावसाठी हर्षल औटे, हिमायतनगरसाठी विजय वाठोरे, अर्धापूरसाठी सिद्धार्थ सोनकांबळे, उमरीसाठी सुमेध तुरेराव, किनवटसाठी शिलरत्न पाटील, नायगावसाठी राहुल कांबळे, बिलोलीसाठी प्रतीक वाघमारे, भोकरसाठी प्रशांत हणमंते आणि माहूरसाठी गुणवंत थोरात यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्हास्तरावरही विविध नियुक्त्या जिल्हा स्तरावर संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर हे जिल्हा समन्वयक (प्रभारी) म्हणून कार्यरत राहणार आहेत. कुणाल गौतम लांडगे यांची जिल्हा संघटक प्रमुखपदी, तर सारिकाताई सावंत व रेखाताई पवार यांची महिला जिल्हा संघटक प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लक्ष्मण पांडुरंग वाघमारे यांच्याकडे दस्तऐवजीकरण प्रमुखपदाची, आनंद पंडित सर यांच्याकडे सांस्कृतिक उपक्रम प्रमुखपदाची, भीमराव गंगाधर जोंधळे यांच्याकडे शिस्तप्रमुखपदाची, तर सम्राट नरवाडे व सुधाकर तुरे यांच्याकडे प्रसिद्धी व जनसंपर्क प्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. याशिवाय विविध विभागांसाठीही प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनात्मक विस्तारावर भर नांदेड जिल्ह्यात उभारण्यात आलेली ही संघटनात्मक रचना इतर जिल्ह्यांमध्येही संघटन उभारणीसाठी संदर्भ ठरावी, या उद्देशाने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यातील तालुके, शहरे आणि ग्रामीण भाग चळवळीशी जोडून सक्रिय व जबाबदार टीम उभारण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे 'आम्ही भारताचे लोक – आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ'च्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

वनमजुराच्या घरात जिवंत काळवीट जप्त!

विक्रीच्या उद्देशाने वन्यप्राणी बांधून ठेवल्याची गुप्त माहिती; वनअधिकाऱ्यांच्या विशेष पथकाची कारवाई

जन सम्राट टाईम्स

चाळीसगाव। प्रतिनिधी: गौताळा अभयारण्य परिसरात वनसंपदा आणि वन्यजीवांच्या सुरक्षेबाबत गेल्या काही दिवसांत गंभीर घटना समोर येत असतानाच, १८ सप्टेंबर २०२६ रोजी वनविभागात वनमजूर म्हणून कार्यरत असलेल्या व्यक्तीच्या शेतातील घरातून जिवंत नर काळवीट जप्त करण्यात आले. अंदाजे दोन वर्षे वयाचे हे काळवीट घरात बांधून ठेवलेले आढळून आले. ते विक्रीच्या उद्देशाने ताब्यात ठेवण्यात आल्याचा संशय असून, या प्रकरणी वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. Crime & Corruption Control Association (CCCA) ला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार संबंधित वनमजुराच्या शेतातील घरात जिवंत काळवीट बांधून ठेवण्यात आले होते. CCCA च्या पदाधिकाऱ्यांनी ही माहिती तत्काळ वरिष्ठ वनअधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवली. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष पथक तयार करून स्वतःच्या देखरेखीखाली कारवाई केल्याची माहिती आहे. विशेष पथकाने संबंधित शेतातील घरावर धाड टाकली असता काळवीट जिवंत अवस्थेत बांधून ठेवलेले आढळले. वनविभागाने त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान स्थानिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना दूर ठेवण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे. या प्रकरणात सुभाष शिवाजी कुऱ्हाडे, रा. शिवापूर, वनमजूर, यांचे नाव संशयित म्हणून समोर आले आहे. वनविभागाच्या नोंदीनुसार Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत कलम 9, 39(अ), 39(ब), 40(2) आणि 51 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काळवीट (Blackbuck – Antilope cervicapra) हा संरक्षित वन्यप्राणी असून त्याचा बेकायदेशीर ताबा, पकड, विक्री किंवा त्यासंबंधीचा व्यवहार हा



कायद्यानुसार गंभीर वन्यजीव गुन्हा ठरू शकतो. वरिष्ठ वनकर्मचाऱ्याच्या भूमिकेचा संशय; तपासाची मागणी या प्रकरणाला अधिक गंभीर वळण देणारी बाब म्हणजे CCCA च्या माहितीनुसार, संबंधित वनमजुराच्या वरिष्ठ असलेल्या वनविभागातील एका कर्मचाऱ्यानेच काळवीट शेतातील घरात बांधून ठेवण्यास सांगितल्याचा आणि दोघे मिळून त्याची विक्री करण्याच्या तयारीत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, ही बाब सध्या तपासाधीन असून तिची सत्यता अधिकृत तपास आणि पुराव्यांच्या आधारेच निश्चित होणे आवश्यक आहे. त्यामुळे काळवीटाचा स्रोत, तो संबंधित व्यक्तीपर्यंत कसा पोहोचला, त्याची वाहतूक कोणी केली, संभाव्य खरेदीदार कोण होते, संबंधित व्यक्तींमधील संपर्क आणि आर्थिक व्यवहार झाले का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. अंजन, चंदननंतर आता काळवीट गेल्या पंधरा दिवसांत गौताळा परिसरात वनसंपदा व वन्यजीवांशी संबंधित सलग तीन गंभीर प्रकरणे समोर आल्याचा दावा CCCA कडून करण्यात आला आहे. प्रथम अंजन वृक्षांची अवैध तोड व तस्करी, त्यानंतर चंदन तस्करी आणि आता जिवंत काळवीट जप्तीची घटना समोर आली आहे. यातील काही कारवाया वरिष्ठ वनअधिकाऱ्यांनी विशेष पथके तयार करून केल्याची माहिती आहे. स्थानिक अधिकारी-कर्मचाऱ्यांना काही कारवायांपासून दूर ठेवण्यात आल्याची बाबही चर्चेत आली आहे. दुसरीकडे, चंदन तस्करीच्या प्रकरणात वनमजुरांनी तस्करांना पकडल्याचेही समोर आले आहे. या सर्व घटनांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी झाल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होण्यास मदत होईल, अशी भूमिका CCCA ने मांडली आहे. संभाव्य तस्करी मार्गांवर लक्ष गौताळा अभयारण्य परिसरातून वन्यजीव किंवा वन्यजीवजन्य मालाच्या अवैध वाहतुकीसाठी वापरले जात असल्याचे संभाव्य मार्ग CCCA ने निदर्शनास आणल्याचे सांगितले आहे. त्यात चाळीसगाव–धुळे–नवापूर–गुजरात, चाळीसगाव–मालेगाव–मुंबई आणि चाळीसगाव–छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर–मुंबई या मार्गांचा समावेश असल्याचे संस्थेने म्हटले आहे. या मार्गांवरून प्रत्यक्षात वन्यजीवांची किंवा वन्यजीवजन्य मालाची अवैध वाहतूक होते का, याची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची आवश्यकता आहे. आगामी काळात या संभाव्य मार्गांवर लक्ष ठेवून वन्यजीव तस्करीसंदर्भातील माहिती वरिष्ठ वनअधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार असल्याचे CCCA कडून सांगण्यात आले. संपूर्ण साखळीचा तपास करण्याची मागणी वन्यजीव संरक्षणाची जबाबदारी असलेल्या विभागाशी संबंधित व्यक्तीच्या घरातून संरक्षित वन्यप्राणी आढळणे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे केवळ काळवीट जप्त करून प्रकरण थांबविण्याऐवजी त्याचा उगम, पकड, वाहतूक, संभाव्य विक्री आणि त्यामागील व्यक्तींचा शोध घेऊन संपूर्ण साखळी उघड करण्याची मागणी CCCA ने केली आहे.

शिक्षिकेविरोधात पालक आक्रमक; सभेत घुसून संस्थाचालकांना जाब

जन सम्राट टाईम्स

धुळे। (प्रतिनिधी): पाल्यांचे शैक्षणिक नुकसान करण्याची धमकी देऊन पालकांशी अरेरावी केल्याचा आरोप असलेल्या शिक्षिकेविरोधात कारवाईच्या मागणीसाठी पालक आक्रमक झाले. माजी उपमहापौर तथा भाजपा नगरसेविका कल्याणी अंपळकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो पालकांनी जय हिंद शैक्षणिक संस्थेवर मोर्चा काढत संस्थेच्या सुरू असलेल्या सभेत प्रवेश केला आणि पदाधिकाऱ्यांना थेट जाब विचारला. यामुळे काही काळ संस्थेच्या परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दोन दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांच्या विविध समस्या घेऊन जय हिंद शैक्षणिक संस्थेत भेटीसाठी गेलेल्या माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर व काही पालकांचा संबंधित शिक्षिकेसोबत वाद झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या घटनेनंतर शिक्षिकेविरोधात कारवाई करण्याचे आश्वासन संस्थाचालकांकडून देण्यात आले होते. मात्र, आश्वासनानंतरही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत पालकांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली. संबंधित शिक्षिकेचा कथित मुजोरपणा वाढल्याचा आरोप करीत कल्याणी अंपळकर यांच्या नेतृत्वाखाली पालकांनी संस्थेवर मोर्चा काढला. मोर्चेकरी पालक थेट संस्थेच्या सभेत पोहोचल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पालकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या, शिक्षिकेचे कथित वर्तन आणि याप्रकरणी संस्थेने केलेल्या कारवाईबाबत पदाधिकाऱ्यांकडे जाब विचारला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जय हिंद शैक्षणिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मोर्चेकरी महिलांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित प्रकरणात कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, संबंधित शिक्षिकेचे कायमस्वरूपी निलंबन करण्याबरोबरच संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माजी उपमहापौर तथा भाजपा नगरसेविका कल्याणी अंपळकर यांनी केली आहे. पालकांच्या या आक्रमक भूमिकेमुळे आता जय हिंद शैक्षणिक संस्था संबंधित शिक्षिकेविरोधात नेमकी कोणती कारवाई करते, याकडे पालकांसह शहराचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

'शिवशक्ती-भीमशक्ती' महामेळावा पीपल्स रिपब्लिकन पार्टीतर्फे आयोजन



जन सम्राट टाईम्स

मलकापूर| प्रतिनिधी : पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष जयदीपजी जोगेंद्रजी कवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईत 'शिवशक्ती-भीमशक्ती महामेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे हा मेळावा होणार असल्याची माहिती पक्षाच्या प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे. आयोजकांच्या माहितीनुसार, या महामेळाव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील विविध मंत्री व मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उद्योगमंत्री उदय सामंत, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मत्स्यपालन व बंदरे विकासमंत्री नितीन राणे, कृषिमंत्री दत्ताजी भरणे आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीचीही आयोजकांकडून घोषणा करण्यात आली आहे. सामाजिक एकता व समतेचा संदेश माध्यमातून सामाजिक एकता, समता आणि लोकशाही मूल्यांचा संदेश देण्याच्या उद्देशाने महामेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी म्हटले आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील विविध घटकांना एका व्यासपीठावर आणण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. जयदीप कवाडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून पक्षाच्या संघटनात्मक उपक्रमांसोबत सामाजिक एकतेचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना उपस्थितीचे आवाहन महामेळाव्याच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तयारीला लागले आहेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष गणेशराव उन्हावणे, प्रदेशाध्यक्ष अमितजी सोनवणे यांच्यासह विविध पदाधिकारी आयोजनात सहभागी असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यातील पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी २३ सप्टेंबर रोजी मुंबई येथे होणाऱ्या महामेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे होणाऱ्या या कार्यक्रमात 'शिवशक्ती-भीमशक्ती' या संकल्पनेच्या माध्यमातून सामाजिक एकता, समता आणि लोकशाही मूल्यांवर भर देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई!

ट्रॅक्टर-ट्रॉलीसह १ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

फैजपूर । प्रतिनिधी: विनापरवाना अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर फैजपूर पोलिसांनी धडक कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह वाळू असा एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध वाळू चोरी व विनापरवाना वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी फैजपूर शहराजवळील पिंपरुड फाट्याच्या अलीकडे किशोर गुजराती यांच्या टेंडिंग कंपनीजवळ ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, पंढरीनाथ हरी सपकाळे (रा. विरोदा, ता. यावल, जि. जळगाव) हे विनाक्रमांकाच्या स्वराज ट्रॅक्टर-ट्रॉलीमधून वाळूची वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. माहिती मिळताच फैजपूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ट्रॅक्टरचालकाकडे वाळू वाहतूक करण्याचा परवाना



तसेच अन्य आवश्यक कागदपत्रांची मागणी केली. मात्र, कोणताही वैध परवाना नसल्याचे त्याने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले. त्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून ट्रॅक्टर, ट्रॉली आणि वाळू असा एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पोलीस हवालदार रुपेश पाटील यांच्या फिर्यादीवरून १९ सप्टेंबर रोजी रात्री ११.५३ वाजता फैजपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सीसीटीएनएस गु.र.नं. १९२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) तसेच खाण आणि खनिज (नियमन व विकास) अधिनियम १९५७ मधील कलम २१(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. फैजपूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदीप रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.विनापरवाना अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर फैजपूर पोलिसांनी धडक कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह वाळू असा एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध वाळू चोरी व विनापरवाना वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी फैजपूर शहराजवळील पिंपरुड फाट्याच्या अलीकडे किशोर गुजराती यांच्या टेंडिंग कंपनीजवळ ही कारवाई करण्यात आली.

बिलाडीत दोन गटांत मोठा राडा; घरावर दगडफेक, तरुणावर चाकू हल्ला

१५ जणांविरोधात गुन्हा दाखल, तरुण पोलिसांच्या ताब्यात

जन सम्राट टाईम्स

धुळे । (प्रतिनिधी): धुळे तालुक्यातील बिलाडी गावात किरकोळ कारणावरून दोन गटांत मोठा राडा झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत एका घरावर दगडफेक करण्यात आल्याचा तसेच एका तरुणावर चाकूने हल्ला झाल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात अजय भाऊसाहेब मोहिते (वय १८) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धुळे येथील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याची माहिती आहे. या प्रकरणी प्रवीण मोहिते यांच्या फिर्यादीवरून धुळे तालुका पोलीस ठाण्यात रोहित भील, सागर भील यांच्यासह इतर गावातील सुमारे १५ जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी काही तरुणांना ताब्यात घेतल्याची माहिती असून, इतर संशयितांचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. घरावर दगडफेक केल्याचा आरोप मिळालेल्या माहितीनुसार, बिलाडी



गावात सायंकाळच्या सुमारास किरकोळ कारणावरून दोन गटांत वाद झाला. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. मोहिते कुटुंबीयांच्या आरोपानुसार, रोहित भील व सागर भील यांनी इतर गावांतील काही तरुणांना बोलावून मोहिते यांच्या घरावर दगडफेक केली. याचदरम्यान तरुणावर चाकूने हल्ला झाल्याचा आरोप आहे. सायंकाळी सुरू झालेला हा वाद रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे मोहिते कुटुंबीयांनी सांगितले. घटनेनंतर जखमी अजय मोहिते याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आरोपींवर कठोर कारवाईची मागणी या घटनेप्रकरणी तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मोहिते कुटुंबीयांनी केली आहे. दरम्यान, सध्या बिलाडी गावात परिस्थिती शांत असल्याची माहिती असून, पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू आहे. या घटनेनंतर माणिक गवा मोहिते, नारायण मोहिते, भटू मोहिते, किशोर मोहिते, रवींद्र जाधव, पांडुरंग मोहिते, हौशीलाल मोहिते, देविदास जाधव, भाऊसाहेब मोहिते, ताराबाई मोहिते, कलुबाई मोहिते, बेबाबाई मोहिते, छायाबाई मोहिते, चंद्रकला मोहिते, मीना मोहिते यांच्यासह मोहिते कुटुंबीय उपस्थित होते. धुळे तालुक्यातील बिलाडी गावात किरकोळ कारणावरून दोन गटांत मोठा राडा झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत एका घरावर दगडफेक करण्यात आल्याचा तसेच एका तरुणावर चाकूने हल्ला झाल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात अजय भाऊसाहेब मोहिते (वय १८) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धुळे येथील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याची माहिती आहे.

वाढदिवसाला समाजसेवेची जोड; शिरसाळा मारोती येथे रक्तदान, मंदिराला २ एसींची भेट

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: लोकनेते आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिरसाळा मारोती येथे रक्तदान शिबिरासह विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ७४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याचवेळी मुक्ताईनगर येथील माजी नगरसेवक तथा शिवसेना कार्यकर्ते पियूष महाजन यांनी शिरसाळा मारोती मंदिराला दोन एसी भेट देत मंदिरसेवेत योगदान दिले. मतदारसंघात दुष्काळग्रस्त परिस्थिती असल्याने यंदा वाढदिवसाचा उत्सव साजरा न करण्याचा निर्णय आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांनी घेतला होता. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता समाजोपयोगी उपक्रम राबवून जनसेवा करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत शिरसाळा मारोती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांनी भेट देऊन रक्तदात्यांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी शिरसाळा येथील अनिल पाटील यांना



वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे त्यांनी आभार मानले. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. वैभव दादा पाटील, संभाजी पारधी, अमोल व्यवहारे, अनिल पाटील, भैय्या देशमुख, योगेश पाटील, नितीन बोरसे, चंद्रकांत पाटील, सुरेश कोळी, सागर पाटील, अतुल पाटील आणि संदीप पारधी यांनी सहकार्य केले. मंदिराला दोन एसींची भेट शिरसाळा मारोती हे जागृत धार्मिक स्थळ असून मंदिरात दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर परिसरात सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने पियूष महाजन यांनी आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दोन एसी मंदिराला अर्पण केले. यावेळी आमदार चंद्रकांत भाऊ पाटील यांनी श्री हनुमान मंदिरात आरती करून दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या उपस्थितीत मंदिराला देण्यात आलेल्या दोन एसींचे लोकार्पण करण्यात आले. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून त्यातून श्री बजरंगबलींची सेवा घडावी, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. दर शनिवारी मंदिर परिसराची स्वच्छता दरम्यान, मलकापूर तालुक्यातील शिवसेना तालुकाप्रमुख विजय साठे व कामगार सेना तालुकाप्रमुख संतोष साठे हे आपल्या मित्रपरिवारासह दर शनिवारी शिरसाळा मारोती मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबवून सेवाकार्य करत आहेत.

'आयईआय अवॉर्ड 2026'मध्ये पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेजचा बहुमान

राष्ट्रीय स्तरावर अभियांत्रिकी शिक्षणातील गुणवत्तेचा ठसा; दिल्लीतील सोहळ्यात पुरस्कार प्रदान

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत मलकापूर येथील पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा 'आयईआय अवॉर्ड २०२६'ने गौरव करण्यात आला. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) यांच्या वतीने १९ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील लोधी रोड येथील स्कोप कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात महाविद्यालयाला हा सन्मान प्रदान करण्यात आला. द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया) यांच्या वतीने उद्योग आणि अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय



कार्याचा गौरव करण्यासाठी १८ वा आयईआय इंडस्ट्री एक्सलन्स अवॉर्ड २०२६ आणि ५ वा आयईआय इंजिनिअरिंग एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ असा संयुक्त पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. देशभरातील नामांकित अभियांत्रिकी संस्था, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि वरिष्ठ अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती. 'आत्मनिर्भर भारत ते ग्लोबल इंडिया'वर मंथन 'आत्मनिर्भर भारत ते ग्लोबल इंडिया: आत्मविश्वासाने स्वयंपूर्णतेकडे' या संकल्पनेवर आधारित या सोहळ्यात अभियांत्रिकी शिक्षण, उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा, कौशल्य विकास आणि भारताच्या जागतिक औद्योगिक वाटचालीवर विचारमंथन करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. अंजू राठी राणा, माजी इंजिनिअर-इन-चीफ लेफ्टनंट जनरल हरपाल सिंग आणि डीटीडीएफच्या संचालक निधी बन्सल हे मान्यवर उपस्थित होते. एनसीव्हीईटीचे संचालक डॉ. संदीपन नारोटे यांनी मार्गदर्शनपर मुख्य भाषण केले. पॅनेल चर्चेत भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड, एचएलएल लाईफकेअर, होल्टेक कन्सल्टिंग आणि जे. के. टायर्स यांसारख्या औद्योगिक संस्थांच्या प्रतिनिधींनी अभियांत्रिकी शिक्षण व उद्योग क्षेत्रातील परस्पर सहकार्याच्या विविध पैलूंवर चर्चा केली. महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी स्वीकारला पुरस्कार या राष्ट्रीय सोहळ्यात पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने उपप्राचार्य डॉ. युगेश खर्चे, आयक्यूएसी डीन प्रा. आर. एम. चौधरी आणि इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा. जयप्रकाश सोनोने यांनी सहभाग घेत पुरस्कार स्वीकारला. दिल्ली दौऱ्यादरम्यान महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी विविध उद्योगांचे प्रतिनिधी, सेंटर ऑफ एक्सलन्स, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे नोडल अधिकारी तसेच नामांकित अभियांत्रिकी संस्थांच्या प्रमुखांशी संवाद साधला. या चर्चेत महाविद्यालयाचा स्वायत्त दर्जा, नवीन शैक्षणिक उपक्रम, उद्योग-संस्था सहकार्य आणि विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या सहा महिन्यांच्या अनिवार्य इंटर्नशिपवर विशेष भर देण्यात आला.

धीरज भाई यांच्या विवाह सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती



जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: नशिराबाद येथील दैनिक सम्राटचे वार्ताहर आयु. धीरज भाई यांच्या मंगलमय विवाह सोहळ्यास दैनिक सम्राट परिवारातील मान्यवरांनी उपस्थित राहून नववधू-वरास वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी दैनिक सम्राटचे मुख्य संपादक आदरणीय मुकुंदराव नन्नवरे, जळगाव तालुका ग्रामीण प्रतिनिधी आयु. जगदीश भाऊ सपकाळे, दैनिक सम्राटचे क्राईम सल्लागार आदरणीय दिनकर दादा अडकमोल तसेच आदरणीय अरुण दादा वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी नववधू-वराशी आपुलकीने संवाद साधत त्यांना सुखी, समृद्ध आणि आनंदी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी दैनिक सम्राट परिवाराच्या वतीने नवदाम्पत्याच्या भावी आयुष्यासाठी मंगलकामना व्यक्त करण्यात आल्या.

‘एक पद, एक बिंदू’चा फटका; जास्त गुणांचे उमेदवार खालच्या वर्गावर?

शिक्षक भरती २०२५-२६ मधील जाहिरात प्रक्रियेवर उमेदवारांचे आक्षेप; टप्पा दोनमध्ये नियम शिथिल करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

नागपूर। प्रतिनिधी: शिक्षक भरती २०२५-२६ मधील ‘एक पद, एक बिंदू’ या तरतुदीच्या अंमलबजावणीबाबत उमेदवारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. इयत्ता १ली ते १२वीपर्यंतची सर्व रिक्त पदे एकाचवेळी उपलब्ध न झाल्याने भरती प्रक्रियेत विसंगती निर्माण होण्याची शक्यता असल्याचा दावा डी.टी.एड., बी.एड.धारक उमेदवारांनी केला आहे. या प्रक्रियेत अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना कनिष्ठ वर्गांतील पदांवर नियुक्ती स्वीकारावी लागू शकते, तर पुढील टप्प्यात तुलनेने कमी गुण असलेल्या उमेदवारांना उच्च माध्यमिक वर्गातील पदांसाठी संधी मिळू शकते, अशी भीती उमेदवारांनी व्यक्त केली आहे. पवित्र पोर्टलअंतर्गत २०२५ मधील शिक्षक भरतीसाठी जिल्हास्तरावर उमेदवारांच्या नोटिसा व याद्या प्रसिद्ध करण्यात आल्याचे अधिकृत नोंदीत दिसते. तसेच शासनाच्या पूर्वीच्या निर्णयात उच्च माध्यमिक म्हणजेच इयत्ता ११वी ते १२वीतील पात्र रिक्त पदे पवित्र प्रणालीमार्फत भरण्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. आधीच्या भरतीतील अनुभवाचा दाखला उमेदवारांच्या म्हणण्यानुसार, २०२२ मधील शिक्षक भरती प्रक्रियेत इयत्ता १ली ते १२वीची पदे पहिल्या टप्प्यातच उपलब्ध करण्यात आली होती. मात्र त्या वेळी ‘एक पद, एक बिंदू’ची अट लागू नसल्याने पहिल्या टप्प्यात कनिष्ठ वर्गांमध्ये नियुक्ती मिळालेल्या काही उमेदवारांनी उच्च पात्रता आणि गुणांच्या आधारे पुढील टप्प्यात उच्च वर्गांतील पदांसाठी पुन्हा अर्ज केला. त्यामुळे काही पदे रिक्त राहणे आणि भरती प्रक्रियेत गुंतागुंत निर्माण होणे, असा अनुभव आल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. हा प्रकार टाळण्यासाठी ‘एक पद, एक बिंदू’ची अट लागू करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, ही अट लागू करताना सर्व रिक्त पदांची माहिती एकाचवेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते, असा उमेदवारांचा आक्षेप आहे. कट-ऑफ वाढल्याचा उमेदवारांचा दावा उमेदवारांच्या म्हणण्यानुसार, इयत्ता १ली ते ५वी, ६वी ते ८वी आणि ९वी ते १०वी या वर्गांसाठी उपलब्ध झालेल्या पदांची संख्या मर्यादित राहिल्याने संबंधित संवर्गातील स्पर्धा वाढली आणि कट-ऑफही वाढला. दुसरीकडे, इयत्ता ११वी-१२वीच्या पदांची जाहिरात पुढील टप्प्यात झाल्यास, भविष्यातील संधीची खात्री नसल्याने अधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या कनिष्ठ वर्गांतील पदांवर नियुक्ती स्वीकारण्याचा पर्याय निवडल्याचे उमेदवार सांगतात. त्यामुळे पुढील टप्प्यात ११वी-१२वीची पदे उपलब्ध झाली, तर आधीच नियुक्त झालेले अधिक गुणांचे उमेदवार त्या संधीपासून दूर राहू शकतात आणि तुलनेने कमी गुण असलेल्या उमेदवारांना उच्च माध्यमिक पदांसाठी संधी मिळू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ‘शासनाच्या नियोजनाचा फटका आम्ही का सहन करायचा?’ “जास्त गुण मिळवूनही आम्हाला कनिष्ठ वर्गातील पदावर काम करावे लागेल आणि कमी गुण असलेल्या उमेदवारांना पुढील टप्प्यात उच्च वर्गातील पद मिळण्याची शक्यता निर्माण होईल. शासनाच्या भरती नियोजनातील त्रुटीचा फटका उमेदवारांनी का सहन करायचा?” असा सवाल बाधित उमेदवारांनी उपस्थित केला आहे. उमेदवारांनी हा प्रश्न केवळ एका संवर्गापुरता मर्यादित नसून गुण, पात्रता, पदाची उपलब्धता आणि निवड प्रक्रियेतील पारदर्शकता यांच्याशी संबंधित असल्याचे म्हटले आहे. टप्पा दोनमध्ये नियम शिथिल करण्याची मागणी शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्यात ‘एक पद, एक बिंदू’ची अट शिथिल करून अधिक गुण मिळविणाऱ्या आणि आवश्यक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना उच्च वर्गातील पदांसाठी संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे. शासनाने या आक्षेपांची तातडीने दखल घेऊन भरती प्रक्रियेतील संभाव्य विसंगती दूर करावी आणि उमेदवारांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. अन्यथा, भरती प्रक्रियेतील या मुद्द्यांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा राज्यातील बाधित शिक्षक उमेदवारांनी दिला आहे. त्यामुळे शिक्षक भरती २०२५-२६ मधील पुढील टप्प्यातील निर्णयांकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे.



शिक्षक भरती २०२५-२६ मधील जाहिरात प्रक्रियेतील उमेदवारांचे आक्षेप समोर आल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी या प्रकरणी तातडीची बैठक बोलावली असून, उमेदवारांच्या आक्षेपांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. बैठकीत ‘एक पद, एक बिंदू’ अंतर्गत पात्रता, गुण आणि पदांची उपलब्धता यांचा एकत्रित आढावा घेतला जाणार आहे. आवश्यक असल्यास शासनाकडे शिफारस करण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. पवित्र पोर्टलअंतर्गत २०२५ मधील शिक्षक भरतीसाठी जिल्हास्तरावर उमेदवारांच्या नोटिसा व याद्या प्रसिद्ध करण्यात आल्याचे अधिकृत नोंदीत दिसते. तसेच शासनाच्या पूर्वीच्या निर्णयात उच्च माध्यमिक म्हणजेच इयत्ता ११वी ते १२वीतील पात्र रिक्त पदे पवित्र प्रणालीमार्फत भरण्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. आधीच्या भरतीतील अनुभवाचा दाखला उमेदवारांच्या म्हणण्यानुसार, २०२२ मधील शिक्षक भरती प्रक्रियेत इयत्ता १ली ते १२वीची पदे पहिल्या टप्प्यातच उपलब्ध करण्यात आली होती. मात्र त्या वेळी ‘एक पद, एक बिंदू’ची अट लागू नसल्याने पहिल्या टप्प्यात कनिष्ठ वर्गांमध्ये नियुक्ती मिळालेल्या काही उमेदवारांनी उच्च पात्रता आणि गुणांच्या आधारे पुढील टप्प्यात उच्च वर्गांतील पदांसाठी पुन्हा अर्ज केला. त्यामुळे काही पदे रिक्त राहणे आणि भरती प्रक्रियेत गुंतागुंत निर्माण होणे, असा अनुभव आल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. हा प्रकार टाळण्यासाठी ‘एक पद, एक बिंदू’ची अट लागू करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, ही अट लागू करताना सर्व रिक्त पदांची माहिती एकाचवेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पाचोरा महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर पथनाट्य



जन सम्राट टाईम्स

पाचोरा | प्रतिनिधी : क्रांतिसूर्य तात्यासाहेब महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथे अमळनेर ग्रुपच्या वतीने ‘सत्यशोधक मेळा’ या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. लीलाधर पाटील यांनी लेखन केलेल्या या पथनाट्यात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्याबरोबरच त्यांच्या सामाजिक सुधारणांच्या विचारांची आणि आजच्या काळातील समर्पकतेची मांडणी करण्यात आली. अमळनेरच्या कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष प्रा. अशोक पवार, प्रा. डॉ. लीलाधर पाटील, शिवव्याख्याते रामेश्वर भदाणे, शिक्षक डी. ए. पाटील, सेवानिवृत्त शिक्षक संजय पाटील, दिशाताई संदानशिव, गायिका सुनीताताई मोरे, माधुरीताई पाटील, मुख्याध्यापिका निवेदिताताई कापडणेकर तसेच जिल्हा परिषद आरोग्य विभागात कार्यरत भारतीताई कोळी यांनी पथनाट्यातून महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर केला. महात्मा फुले यांनी शिक्षण, सामाजिक समता, स्त्री शिक्षण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून देताना त्यांच्या विचारांची आजच्या सामाजिक परिस्थितीशी सांगड घालण्यात आली. पथनाट्याच्या सादरीकरणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. वासुदेव वले यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. सुनीता गुंजाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी नितीन पाटील तसेच आर. एस. ठाकूर यांचे सहकार्य लाभले. यावेळी गो. से. हायस्कूलचे चेअरमन दादासाहेब खलील देशमुख, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बापूसाहेब डॉ. बी. एन. पाटील, नंदू सोनार, प्राचार्य प्रा. डॉ. वासुदेव वले, उपप्राचार्य प्रा. डॉ. जे. व्ही. पाटील, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. शरद पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. सुनीता गुंजाळ, प्रा. डॉ. कमलाकर इंगळे, प्रा. डॉ. योगेश पुरी, प्रा. डॉ. माणिक पाटील, प्रा. डॉ. अतुल सूर्यवंशी, प्रा. संदीप टोपले यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रांतिसूर्य तात्यासाहेब महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा येथे अमळनेर ग्रुपच्या वतीने ‘सत्यशोधक मेळा’ या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला.

मामुराबादमध्ये उघडे चेंबर; दुर्घटनेला निमंत्रण!

शिवाजी महाराज प्रवेशद्वारा’जवळ १० महिन्यांपासून धोकादायक

जन सम्राट टाईम्स



मामुराबाद। प्रतिनिधी: मामुराबाद गावाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील ‘श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार’ परिसरात रस्त्यावरील गटारीचे चेंबर गेल्या तब्बल ८ ते १० महिन्यांपासून उघडे असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामस्थांनी वारंवार सूचना आणि तक्रारी करूनही या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अपघाताची भीती; वाहनधारकांची कसरत मुख्य रस्त्यावर आणि प्रवेशद्वाराच्या अगदी जवळच हे चेंबर उघडे असल्याने दुचाकी तसेच चारचाकी वाहनधारकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी उघडे चेंबर स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. वाहनाचा तोल जाऊन गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पादचारी आणि परिसरातील रहिवाशांसाठीही हे उघडे चेंबर धोकादायक ठरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ‘दुर्घटना झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?’ गेल्या अनेक महिन्यांपासून मुख्य रस्त्यावरील हा धोका कायम असतानाही त्याची दुरुस्ती का करण्यात आली नाही, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. “एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच ग्रामपंचायत प्रशासनाला जाग येणार का?” असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे. नागरिकांनी वेळोवेळी सूचना करूनही समस्या कायम असल्याने ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. तातडीने चेंबर बंद करण्याची मागणी उघड्या चेंबरमुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनधारकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याने ग्रामपंचायतीने कोणताही विलंब न करता चेंबरची तातडीने दुरुस्ती करून ते मजबूत झाकणाने बंद करावे, तसेच रस्ता सुरक्षित करावा, अशी आग्रही मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. आता ग्रामपंचायत प्रशासन या समस्येची कितपत तातडीने दखल घेते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दिव्यांगांनी न्यूनगंड न ठेवता यशशिखर गाठावे : खासदार स्मिताताई वाघ

जन सम्राट टाईम्स



जळगाव । (प्रतिनिधी): एखादा अवयव कमी आहे म्हणून दिव्यांगांनी मनात कोणताही न्यूनगंड न ठेवता सकारात्मक विचाराने मोठे कार्य करून यशाचे शिखर गाठावे आणि समाजासाठी प्रेरणादायी ठरावे, असे आवाहन जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिताताई वाघ यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या एडीप (ADIP) योजनेंतर्गत भारतीय कृत्रिम अवयव निर्माण निगम (एलिम्को) आणि खासदार स्मिताताई वाघ यांच्या विशेष प्रयत्नातून सरदार वल्लभभाई पटेल लेवा भवन सभागृहात दिव्यांगांसाठी पुनर्वसन साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरातील दिव्यांग लाभार्थींची तपासणी करून अवघ्या पंधरा दिवसांत आवश्यक पुनर्वसन साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिताताई वाघ, जळगाव शहराचे आमदार सुरेशजी (राजूमामा) भोळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सहाय्यक आयुक्त पी. एस. म्हस्के, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महापौर दीपमालाताई काळे, नगरसेविका उज्वलाताई बेंडाळे, प्रकाश बालानी, भाजपा दिव्यांग सेलचे संयोजक गणेश वाणी, एलिम्को मुंबईचे सहव्यवस्थापक कमलेश यादव, स्वयंदिप संस्थेच्या अध्यक्षा तथा उद्योजिका मीनाक्षीताई निकम, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अशासकीय सदस्य मुकुंद गोसावी, गणेश पाटील, अक्षय महाजन आदी उपस्थित होते. शहरासह जिल्हाभरातील शासनाने निश्चित केलेल्या २१ प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गातील लाभार्थी तसेच मूकबधिर व मानसिक गतिमंद शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते लाभार्थींना बॅटरीवर चालणाऱ्या तीनचाकी सायकली, व्हीलचेअर, सीपी चेअर, वॉकर, कुबड्या, काठ्या, स्टिक, कर्णयंत्र, टी.एल.एम. किट आदी अत्याधुनिक पुनर्वसन साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एलिम्कोचे सहव्यवस्थापक कमलेश यादव यांनी केले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिव्यांगांच्या विकासासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून, विविध शासकीय सेवा-सुविधांचा योग्य लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. त्यांनी दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. आमदार सुरेश (राजूमामा) भोळे यांनी लाभार्थींना मिळालेल्या साहित्याचा योग्य वापर करून छोटे-मोठे उद्योग उभारता येतील आणि त्यातून स्वावलंबी होता येईल, असे सांगितले.

जय जिजाऊ मित्र मंडळाच्या क्रीडा स्पर्धांचा उत्साहात समारोप

जन सम्राट टाईम्स

बाभळे, ता. धरणगाव । प्रतिनिधी: बाभळे येथील जय जिजाऊ मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचा उत्साहात समारोप झाला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून लहान मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने मंडळातर्फे दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. यंदाही वक्तृत्व स्पर्धा, गोणपाट शर्यत, डोक्याने फुगे फोडणे अशा विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या स्पर्धांमुळे परिसरात उत्साहाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः चिमुकल्यांनी गोणपाट शर्यतीत सहभागी होत मनसोक्त आनंद लुटला. वक्तृत्व स्पर्धेत पार्थ पाटील प्रथम



आयोजित वक्तृत्व स्पर्धेत चि. पार्थ वाल्मीक पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला, तर कु. परी प्रशांत पाटील हिने द्वितीय क्रमांक मिळविला. दोन्ही विजेत्या विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या वाणीने उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धा संपल्यानंतर विविध गटांतील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरणामुळे सहभागी चिमुकल्यांमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळाला. ‘गणेशोत्सवातून सामाजिक एकोपा साधण्याचे काम’ यावेळी श्री. विजयकुमार पाटील यांनी जय जिजाऊ मित्र मंडळाच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता, त्यातून सामाजिक एकोपा वाढविण्यासोबतच लहान मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे काम मंडळ करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांना त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जय जिजाऊ मित्र मंडळ, बाभळेच्या सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.बाभळे येथील जय जिजाऊ मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांचा उत्साहात समारोप झाला.

पोलीस भरती इच्छुकांसाठी मोगलाईच्या राजा गणेश मंडळाची सराव परीक्षा

धार्मिक कार्यासोबत शैक्षणिक उपक्रम; २०० तरुण-तरुणींचा सहभाग

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: पोलीस भरतीसह विविध शासकीय सेवांमध्ये जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी ओम तरुण मित्र मंडळ प्रणित ‘मोगलाईचा राजा’ गणेश मंडळातर्फे सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात धुळे शहरासह जिल्ह्यातील सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. धुळे शहरातील मोगलाई परिसरातील मोगलाईचा राजा गणेश मंडळाने गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी विविध शासकीय पदांसाठी तयारी करणाऱ्या युवक-युवतींना स्पर्धा परीक्षेचा सराव करण्याची संधी उपलब्ध



करून दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, धार्मिक उत्सवासोबत शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मंडळाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. सराव परीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनीला १०० गुणांचा पेपर देण्यात आला होता. तब्बल दीड तास विद्यार्थ्यांनी परीक्षा सोडविली.

स्पर्धा परीक्षेची प्रत्यक्ष परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्यांना स्वतःची तयारी तपासता यावी, वेळेचे नियोजन करता यावे आणि परीक्षेचा सराव व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता. या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाच्या वतीने बक्षिसेही ठेवण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांकासाठी ३१०० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१०० रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ११०० रुपये, तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांकासाठी १५०० रुपये आणि द्वितीय क्रमांकासाठी ११०० रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली होती. गणेशोत्सवाच्या माध्यमातून तरुणांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरला. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना परीक्षेचा प्रत्यक्ष सराव करण्याची संधी मिळाल्याने सहभागी विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. ‘मोगलाईचा राजा’ गणपती नवसाला पावतो, अशी मंडळाच्या कार्यकर्त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे गणेशोत्सव काळात विद्यार्थीहिताबरोबरच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल मोरे, उपाध्यक्ष कांतीलाल मोरे, खजिनदार लकी मोरे, विपुल मोरे, मुकेश खेडकर, पंडित मोरे, मयूर मोरे, ईश्वर मोरे, बंटी मोरे, हरीश मोरे, गोविंद मोरे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस भरतीसह विविध शासकीय सेवांमध्ये जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी ओम तरुण मित्र मंडळ प्रणित ‘मोगलाईचा राजा’ गणेश मंडळातर्फे सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात धुळे शहरासह जिल्ह्यातील सुमारे २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले.

‘महात्मा’ पथनाट्याने जागविला फुले विचारांचा जागर!

जन सम्राट टाईम्स

पाचोरा | प्रतिनिधी: महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २००व्या जयंती वर्षानिमित्त पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचालित श्री. गो. से. हायस्कूलमध्ये प्रख्यात शिवव्याख्याते प्रा. लीलाधर पाटील लिखित ‘महात्मा’ या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्यातून महात्मा फुले यांच्या विचारांचा जागर करताना शिक्षणक्रांती, स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि वंचितांच्या उत्थानाचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला.

पथनाट्याच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी समाजातील रूढी-परंपरांना दिलेले आव्हान, शिक्षणाच्या माध्यमातून केलेली सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि स्त्रीशिक्षणासाठी केलेले कार्य विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे उलगडण्यात आले. सादरीकरणाला उपस्थित विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी युवा कल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अशोक पवार, शालेय समितीचे खलिल देशमुख, मुख्याध्यापक आर. एल. पाटील, उपमुख्याध्यापक पी. एम. पाटील, पर्यवेक्षक अंजली आर. गोहिल, आर. बी. बांठीया, एम. टी. कौंडिण्य, सांस्कृतिक विभागप्रमुख आर. बी. बोरसे, क्रीडा प्रमुख एस. पी. करंदे, किमान कौशल्य विभागप्रमुख मनीष बाविस्कर, सौ. ए. व्ही. पाटील यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. आर. पाटील यांनी केले, तर आभार आर. बी. बोरसे यांनी मानले.